
महासागर अमरावती
गुरूवार, दि. 27 मार्च 2025
पान 3

वोकाट्राइब प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अमरावती ला हॉस्पिटलमध्ये कामासाठी मेगा भरती सुरू आहे
वार्ड बॉय -150 , जीएनएम नर्सिंग -100 , हाऊस कीपिंग-90 ही पदे भरती सुरू आहे.
संपर्क 07620610131 09623316598 08305146500
8 तास ड्युटी राहील
पगार 10,000-15000
संपर्काची वेळ
सकाळी 10 ते संध्याकाळी 5 पर्यंत.

## खासगी वाहनामधून मंगळसूत्र लंपास

**अमरावती**- अमरावती येथून गोराळा येथे खासगी वाहनाने आपल्या पतीसोबत येणाऱ्या महिलेचे 27 ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र अज्ञात महिलेने चोरून नेल्याची घटना गोराळा बस स्टॉप वर घडली. आशा विनायक बोबडे रा. अर्जुन नगर अमरावती या आपल्या पतीसह एका खासगी बस मधून निरपिंगळाई गडावर दर्शनासाठी आल्या होत्या.

# आयशर ट्रकची उभ्या टेम्पोला धडक; दोन जणांचा मृत्यू







### आयशर ट्रक चालकावर गुन्हा दाखल

या अपघातप्रकरणी आयशर ट्रकचा चालक युवराज भाऊसाहेब ढोले (30, रा. भोसे, ता. कर्जत, जि.अहिल्यानगर) याच्यावर तळेगाव दशासर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### महामार्गावर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

या अपघातामुळे समृद्धी महामार्गावर सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे वाहनचालकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. तसेच, प्रशासनानेही महामार्गावरील आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर द्यावा, अशी मागणी प्रवासी व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

### समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,** ( दि.26 )-समृद्धी महामार्गावर वाढोणा गावाजवळील चॅनल क्रमांक 108/600 येथे बुधवारी (ता. 26) पहाटे भीषण अपघात घडला. भिवंडी येथून नागपूरच्या दिशेने निघालेल्या टेम्पोचा टायर पंचर झाल्याने चालक व वाहक टायर बदलण्याचे काम करत होते. यावेळी मागून भरधाव आलेल्या आयशर ट्रकने (क्रमांक एम.एच.12-एम.व्ही.5630) उभ्या असलेल्या टेम्पोला जोरदार धडक दिली. या अपघातात चालक बिलाल अहमद (30) आणि वाहक संतोषकुमार रामपाती यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर धोंडगे, महामार्ग पोलिस प्रभारी माया चाटसे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या मदतीने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# हतरु येथील डॉक्टर सह चौघे निलंबित

### आरोग्यमंत्र्याचा दणका




**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.26 ) -** मेळघाट सारख्या अति दुर्गम भागात असलेल्या हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रात आठवड्यातून एकच दिवस येणारा डॉक्टर सह औषधी निर्माता व प्रयोगशाळा तंत्रज्ञ चौघांना आरोग्यमंत्र्यांच्या आदेशानंतर जिल्हा परिषदेच्या सीईओ यांनी मंगळवारी निलंबित केले. या कारवाईने मेळघाटासह जिल्ह्यातील कामचुकार व दांडी बहाद्दर अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये धडकी भरली आहे . कारवाईचे टांगती तलवार वृत्त महासागरने प्रकाशित केले होते ते तंतोतंत खरे ठरले. मेळघाटात मोठ्या प्रमाणात आरोग्य समस्या आहे. अति दुर्गम हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रात सोमवारी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, मेळघाट चे आमदार केवलराम काळे व आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दौरा केला. आरोग्यमंत्र्यांनी सर्वांना आरोग्याच्या सुविधा मिळत आहे किंवा नाही आदिवासी भागाची ओरड मोठ्या प्रमाणात असल्याने त्या संदर्भात आरोग्यमंत्र्यांनी नियोजित दौरा ठरवून पाहणी कुठल्या भागाची करणार हे सुद्धा स्पष्ट केले होते. त्या दौऱ्यामध्ये आठवड्यातून एकच दिवस डॉक्टर येत असल्याचे पुढे आले तर औषध निर्माता व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या सुद्धा चुका पुढे आल्या.

> योग्य मंत्र्यांनी मेळघाट दौरा केला त्या दौऱ्यात त्यांना हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रात उणवा जाणवल्या त्यांनी आदेश दिल्यानंतर सीईओ यांनी डॉक्टर सह चौघांना निलंबित केले
> **सुरेश आसोले,**
> **जिल्हा आरोग्य अधिकारी**
> **अमरावती**

### यांना केले निलंबित

हतरू प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर रवींद्र चव्हाण, प्रयोगशाळा तंत्रज्ञ संतोष कोवे, औषध निर्माता परेश शहा व विजय कापडे या चौघांना जिल्हा परिषदेच्या सीईओ यांनी आरोग्यमंत्र्यांच्या आदेशानंतर मंगळवारी निलंबित केले.

### बेजबाबदारपणाचा कळस

आरोग्य मंत्री येणार असल्याने यंत्रणा पूर्णता सज्ज होती. तरीसुद्धा अति दुर्गम असलेल्या हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रात कालबाह्य ब्लड शुगर तपासणी साठी लागणाऱ्या स्ट्रीप व बंद जनरेटर, सोलर बंद पाणी नाही या सर्व बाबी आरोग्यमंत्र्यांना संताप व्यक्त करणाऱ्या ठरल्या त्यांनी तसे आदेश दिले.

### महासागरचे वृत्त तंतोतंत खरे ठरले

मेळघाटात आरोग्य मंत्र्यांनी दौरा केल्यानंतर चौघांवर कारवाईची टांगती तलवार असल्याचे संकेत महासागरने सोमवारी प्रकाशित केलेल्या वृत्तांत प्रकाशित केले होते ते खरे ठरले.

# धामणगाव रेल्वे स्थानकावर उद्योगपतीचा दुर्दैवी मृत्यू

## सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये चढताना अपघात

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,** ( दि.26 ) - यवतमाळ येथील उद्योगपती सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये चढत असताना तोल जाऊन रेल्वेखाली पडल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी (ता. 26) रात्री 11 वाजताच्या सुमारास धामणगाव रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक 1 वर घडली. मृत उद्योगपती निखिल दिलीप सराफ (45) हे मुंबईला जाण्यासाठी धामणगाव रेल्वे स्थानकावर आले होते. त्यांचे आरक्षण ए-1 कोचमध्ये होते. सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये चढत असताना त्यांचा तोल गेला आणि ते थेट रेल्वेखाली आले, ज्यामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच बडनेरा जी.आर.पी.एफ.च्या पोलीस कर्मचारी अनिता इंगळे आणि हरीश कुसराम यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला असून, पुढील तपास बडनेरा जी.आर.पी.एफ. पोलीस करीत आहेत. हा अपघात रेल्वे प्रवासादरम्यान काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित करतो.



रेल्वेत चढताना किंवा उतरताना प्रवाशांनी सतर्क राहणे गरजेचे आहे.

### बिबट दिसल्यामुळे नागरिकांमध्ये दहशत

**मोर्शी** - येथून जवळच असलेल्या मायवाडी परिसरात माळु नदीच्या काठावर शेतातील नागरिकांना सायंकाळी 6 व नंतर पुन्हा 8 वा. बिबट दिसल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिसरात बिबट असल्याचे प्रत्यक्ष नागरिकांनी पाहिले या पूर्वीदेखील हेच बिबट खेळ, गोरेगाव, मायवाडी, भाईपुर, सिंभोरा, येवती परिसरात जंगल खाली झाल्यामुळे दिसत आहे. रात्री अचानक छोटू ठाकूर या सोकाराला बिबट दिसला व त्यांनी लगेच पंकज विधळे व हितेश साबळे यांना फोन लावून कल्पना दिली.

# मंत्री साहेब, आमचे शिक्षण थांबवू नका!

## विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्र्यांना लिहीले पत्र ■ संचमान्यतेचा निर्णय रद्द करण्यासाठी साकडे



### पत्रातील मजकुर

**मा. शालेय शिक्षण मंत्री साहेब,**
***सप्रेम नमस्कार...***

कमी पटामुळे आमच्या शाळेतील शिक्षक कमी होणार असे कळले आहे. आम्हाला गावातच शिकवण्यासाठी शिक्षक राहू द्या. कमी शिक्षक असले तर आमचे शिक्षण होणार नाही. बाहेरगावी जाण्यामुळे त्रास होईल व शिक्षण बंद होईल. पुरेसे शिक्षक असले तरच आमचे शिक्षण चांगले होऊ शकते. आमचे शिक्षण थांबवू नका. तुम्ही आमच्या हिताचा नक्कीच विचार कराल असा विश्वास आहे.

**जय हिंद, जय महाराष्ट्र**
**आपला लाडका विद्यार्थी/आपली लाडकी विद्यार्थीनी**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )** - कमी पटामुळे आमच्या शाळेतील शिक्षक कमी होणार असे कळले आहे. आम्हाला गावातच शिकवण्यासाठी शिक्षक राहू द्या. कमी शिक्षक असले तर आमचे शिक्षण होणार नाही. बाहेरगावी जाण्यामुळे त्रास होईल व शिक्षण बंद होईल. पुरेसे शिक्षक असले तरच आमचे शिक्षण चांगले होऊ शकते. आमचे शिक्षण थांबवू नका. तुम्ही आमच्या हिताचा नक्कीच विचार कराल असा विश्वास आहे, अशा मजकुराचे पत्र राज्याच्या शालेय शिक्षण मंत्र्यांना विद्यार्थ्यांकडून पाठवले जात आहे.

संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करण्यासाठी रचनात्मक चळवळीचा एक भाग म्हणून राज्यभरातून विद्यार्थ्यांचे पत्र पाठवले जात आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिली. अमरावती जिल्ह्यातून देखील मोठ्या संख्येने पत्र पाठवले जात आहेत, असे शिक्षक समितीचे नेते गोकुलदास राऊत, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगीतले. 15 मार्च 2024 शासन निर्णयानुसार 2024-25 संच मान्यता अंतिम करण्यात आली आहे. शिक्षण कायद्यातील तरतुदीच्या व 28 ऑगस्ट 2015 (सुधारित 8 जानेवारी 2016) विसंगत अशा शासन निर्णयाने शाळांमध्ये शिक्षकच असणार नाही, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे राज्यात हजारो शिक्षक तर अतिरिक्त होतीलच; परंतु शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडसर निर्माण होणार आहे. शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने किंवा अत्यंत कमी शिक्षक उपलब्ध असल्याने पालकांना आपल्या पाल्यांना परगावच्या शाळेत दाखल करणे क्रमप्राप्त होईल त्यातून प्रामुख्याने किशोरवयीन मुला-मुलींच्या शिक्षणाची परवड होईल व मुलींची सुरक्षितता धोक्यात येण्याची स्थिती आहे. सोबतच बाहेरगावी दररोज जाणे-येणे करण्याचे स्थितीमुळे गळतीचे प्रमाण वाढेल.

बालकांचे शैक्षणिक नुकसान करणारा 15 मार्च 2024 चा शासन निर्णय अद्यापही रद्द करण्यात आलेला नाही. राज्यातील शाळांतील शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा व स्वत:च्या गावातील शिक्षण मिळवण्याचा हक्क डावलणारा शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने 17 मार्च 2025 रोजी संपूर्ण राज्यातुन आंदोलन केले होते. आता हा नविन उपक्रम शिक्षक समितीने हातात घेतला आहे. तसेच शाळा व्यवस्थापण समिती व ग्राम पंचायतचा ठराव शासनाला पाठवावा, अशी विनंती शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केले आहे.

या पत्र व्यवहारातुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास सर्वोच्च प्राधान्य देऊन सदर बाबतीत मागणीनुसार निर्णय घ्यावा अश्या मागणीचे पत्र शिक्षणमंत्र्यांना विद्यार्थी पाठवणार आहे. असे पत्र पाठविण्याची विनंती शिक्षक समितीचे नेते गोकुलदास राऊत, जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर, राज्य महीला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे, जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार, सरचिटणिस शैलेन्द्र दहातोंडे, कार्याध्यक्ष प्रशांत निमकर, कोषाध्यक्ष नंदकिशोर पाटिल, महीला आघाडी प्रमुख सरीता काठोळे, महीला सरचिटणीस विनिता घुलक्षे, कार्याध्यक्ष सुषमा वानखडे, जिल्हा भावना ठाकरे, कार्यालयीन सचिव मनिष काळे, उपाध्यक्ष गोविंद मुंडे, गजानन दातीर, दत्तात्रय रहाटे, एनपीएस जिल्हाध्यक्ष अल्हाद तराळ, सरचिटणीस प्रेममुख ठोंबरे, कार्याध्यक्ष निलेश कांडलकर, कोषाध्यक्ष पंकज दहीकर, तालुकाध्यक्ष नितिन देशमुख, अजयानंद पवार, मनिष येवले, उमेश चुनकीकर, भातकुली, संजय शेलोकार, रत्नाकर पडोळे, रामदास भाग्यवंत, विनोद पाल, योगीराज मोहोड, राजेश ठाकरे, छगन चौधरी, सुनील बोकाडे, तिवसा जगदीश वानखडे, तुळशीदास धांडे, चंद्रकांत कुरळकर, विजय सरोदे, विलास चौखंडे, संतोष राऊत, धनंजय डांगे, श्यामकांत तडस, प्रमोद ढाकूलकर, प्रफुल्ल शेंडे, विवेक ठाकरे, नंदकिशोर रायबोले, किशोर वैराळे, गजानन कावलकर, राहूल वानखडे, विजय खोडस्कर, महिला आघाडी तालुकाध्यक्ष लता टेंभरे, सरिता गाडगे, नम्रता लाडोले, विनिता घुलक्षे, वंदना बंड, उज्वला गुल्हाने, सविता ढाकरे, रुपाली राऊत, सुनिता लोणकर, सुचेता तायडे, सोनाली धोटे, लिनता जावरकर, अर्चना गेडाम, रुपाली देशमुख, विद्या कोथळकर, पल्लवी निघोट, प्रणाली मालधुरे, जयश्री खोबरे, सविता सुपटकर, स्वाती चव्हाण, स्मिता मते, अश्विनी चोपडे, ज्योत्स्ना शेटे, संगिता लाजूरकर, सविता पाचघरे, छाया पोटेकर, संध्या पाटील, दिपाली मांडेकर यांनी केले आहे.

प्रपत्र-१
महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, सिव्हील लाईन, शासकीय रूग्णालया समोर, यवतमाळ, पाटबंधारे मंडळ जवळ यवतमाळ- ४४५००१
ई-मेल पत्ता : eevhelidytl@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२३२- २९९४५०

**ई-निविदा सुचना क्र. ४३ सन - २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता विदभ्र जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदभ्र जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | अ.क्र. | जिल्हा | कामाची अंदाजित किंमत | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा दस्ताऐवजाची किंमत ( नापरतावा ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाक मध्यम प्रकलप, ता. वरूड जि. अमरावती येथे ४० केव्हिए क्षमतेच्या जनित्र संचाचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरण करणे व इतर विद्युतीय काम करण्याबाबत. (निविदा क्र. ४९/२०२४-२५) | अमरावती | रू. २०९२२३१/- | रू. २०९२२/- | रू. २३६०/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २७/०३/२०२५ (११.०० वाजता) ते दिनांक ०३/०४/२०२५ (१७.३० वाजता)
ई-निविदा उघडणे : दिनांक ०४/०४/२०२५ (१७.३० वाजता)
अ) परिशिष्ट क ५००/- रू. च्या स्टॅम्प पेपरवर भरून देणे आवश्यक आहे.
ब) कंत्राटदारांकडे निविदा सादर करण्याकरीता विद्युत अनुज्ञप्ती असणे आवश्यक राहिल.
क) निधी उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा केली जातील.
खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ - http://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही कदल होत असल्यास वरील वेबसाईवर कळविण्यात येईल).
२) कार्यकारी अभियंता, विदभ्र जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ कार्यालयाकरीता सुचना फलक.

**( प्र.प्र.वानखडे )**
कार्यकारी अभियंता
**विमाका./अम./जाही./1347/२०२४-२०२५** विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# लाभार्थिंना हक्काचे घरकुल कधी मिळणार?

## जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-2 करिता आ. खोडकेंचा तारांकित प्रश्न

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 ) -** गोर-गरीब सामान्य जनतेला हक्काचे घरकुल मिळावे म्हणून केंद्र शासनाच्या वतीने सर्वांसाठी घरे या शीर्षा खाली प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-2 राबविण्यात येत आहे. मात्र वर्ष 2024-2025 मध्ये अमरावती जिल्ह्यात घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याला घेऊन दिरंगाई होत असल्याने हजारो लाभार्थी योजनेच्या लाभांपासून वंचित आहे. अमरावती जिल्ह्यात पीएम आवास योजनेच्या कामांना गती मिळण्यासह कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची सूचना करावी ,असा तारांकित प्रश्न अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी राज्य विधिमंडळात लावून धरला.



राज्य विधिमंडळाच्या मार्च -2025 च्या बजेट अधिवेशनात आज दिनांक 26 मार्च रोजीच्या कामकाजादरम्यान आ.सुलभा खोडके यांनी अमरावती जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-दोन अंतर्गत प्रलंबित घरकुलांसंदर्भात मुद्दा उपस्थित केला. अमरावती जिल्ह्यात वर्ष 2024-2025 मध्ये 50 हजार 886 घरकुले मंजूर असतांना केवळ 49 हजार 940 लाभार्थींना योजनेचा पहिला हप्ता वितरित



करण्यात आला आहे. तर 4,237 लाभार्थींना दुसरा व 1,378 लाभार्थींना तिसरा हप्ता देण्यात आला.

तर 366 घरकुल अद्यापही प्रलंबित आहे. म्हणजे जिल्ह्यात 50 हजार लाभार्थींपैकी केवळ 6 हजार घरकुलांची कामेच प्रगतीपथावर असल्याची बाब आमदार महोदयांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. या संदर्भात दिरंगाईची कारणे काय आहे ? असा प्रश्न आमदार महोदयांनी उपस्थित केला.

### सर्व्हे करून तातडीने लाभ द्या!

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लाभार्थींकडे जागा उपलब्ध आहे. पण ते घर बांधू शकत नाही. अशा लोकांना योजनेचा लाभ मिळावा हेच उद्दिष्ट असतांना गरीब लोकं घरकुलापासून वंचित राहत असल्याने सदर कामांत अधिकारी वर्गाकडून प्रचंड दिरंगाई होत असल्याने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत सूचना करावी, अशी मागणी आ.सुलभा खोडके यांनी केली. तसेच ग्रामीण भागातील लाभार्थीचा सर्व्हे करून त्यांना तातडीने योजनेचा लाभ देण्याची मागणी सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने सभागृहासमक्ष करण्यात आली.

### ग्राम विकास मंत्र्यांनी दिले उत्तर

यावर उत्तर देतांना ग्रामीण विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, अमरावती जिल्ह्यात वर्ष 2024-25 चे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा -2 मधील उद्दिष्ट पूर्ण करण्याला घेऊन कामे सुरु आहेत. टप्प्याटप्प्याने घर तयार होत असल्याने लाभार्थींना प्रथम , द्वितीय व तृतीय टप्याने लाभ वितरित करण्यात आला आहे. मात्र घरकुल योजने संदर्भात कुठलीही अडचण निर्माण होत असल्याने अथवा दिरंगाई झाल्यास किंवा भ्रष्टाचार झाल्यास एकही अधिकाऱ्यांना सोडणार नाही. त्यांचेवर तातडीने कारवाई करण्यात येणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात म्हटले आहे.



# जिल्हा परिषदेच्या शिक्षक-विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल

## 32 जण दिल्लीला रवाना | सीईओ संजिता मोहपात्रा यांची संकल्पना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 ) -** अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांच्या अभिनव संकल्पनेतून प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची दिल्ली येथे शैक्षणिक सहल 25 ते 28 मार्च या चार दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्याकरिता जिल्हा परिषद शाळांमधील निवडक 28 विद्यार्थी व 4 शिक्षक असे 32 जण प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालय अमरावती येथुन सहली करीता रवाना झाले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहीरे, उपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने, दीपक कोकतरे, शिक्षण विस्तार अधिकारी मोहम्मद अशफाक यांनी हिरवी झेंडी दाखवून आणि सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांचे स्वागत करुन त्यांना रवाना केले. यावेळी विद्यार्थांचे पालक, वर्ग शिक्षक, मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी उपस्थित होते. या शैक्षणिक सहलीकरीता चौदा तालुक्यांमधुन प्रज्ञावंत विद्यार्थ्याची निवड करण्यात आली होती. सहलीकरिता विद्यार्थी रेल्वेने व विमानाने प्रवास करणार असून दिल्ली येथे राष्ट्रपती भवन, संग्रहालय, इंदिरा गांधी स्मारक, राजघाट, इंडिया गेट, दिल्ली मधिल आदर्श शाळा, अक्षरधाम मंदिर, लोटस मंदिर, लाल किल्ला, कुतुबमिनार या ठिकाणांना भेट देणार आहेत. सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांचा संपूर्ण खर्च अमरावती जिल्हा परिषद करीत आहे. सर्वांचा विमा कवचही शिक्षण विभागाने पुरविले आहे.

या शैक्षणिक सहली करीता सस्कृती उमेश कडू, देवयानी गजानन देशमुख, पियुश नंदू हिरवले, मयुरी अमोल बोरेकर, यासिर अहमद खान, जावेद खान, उम्मे कुलसम मोह. इम्रान, चंचल अनिल शिंदे, अर्णव नितीन मेहरे, शेख बिलाल शेख, आरिफ हम्रान शेख, मोहिब अथार, मनस रुपर बदकेरे, मयूर मनोहर खडक, प्रज्वल सुनील तायडे, अदिती चेतन चव्हान, आयुष मंगेश काल्दाटे, देवश्री मोहन हराले, प्राजक्त संतोष तिमरि, वैष्णवी हरीचंद जारकर, सरथाखरिदास कांताले, लायबा तस्निस मोहम्मद, अश्थ शरद वैद्य, अरहम सलीम मिर्झा, गुंजन निलेश आमले, एकता अमार्डीप कोंडेकर, अनुष्का दिपक युवनेट, भविका मारोती पचेरे, तसेच शिक्षक वीरेंद्र ब्राह्मण, आशिष पांडे, भारती सुनील कासे आणि कु. सुनिता शालिग्रामजी लाहणे यांचा समावेश आहे.



# निलेश मालविय यांच्या निवासस्थानी आरोग्यमंत्र्यांची भेट

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.26 ) -** राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मेळघाट दौर्यातवर आले असताना काटकुंभ येथे चिखलदरा शिवसेना तालुका प्रमुख निलेश मालविय यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी मेळघाटचे आमदार केवलराम काळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल पाटिल अरबट, उपजिल्हाप्रमुख भुषण नागे, युवा स्वाभिमानचे उपेन बछले, कामगार सेना जिल्हा प्रमुख सुभाष घुटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्य समिती सदस्या सोनाली देशमुख उपस्थित होते.

प्रकाश अबीटकर यांचे आगमन होताच शिवसैनिक आणि मालविय परीवाराच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. निलेश मालविय यांनी भगवान बिरसा मुंडा यांची प्रतिमा प्रकाश आबिटकर यांना भेट देऊन त्यांचा सत्कार केला. आरोग्य मंत्र्यांच्या या मेळघाटातील अतिदुर्गम भागातील दौर्यातमुळे जनतेमध्ये व शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यावेळी युवासेना तालुका प्रमुख राकेश झारखंडे, शिवसेना सर्कल प्रमुख घनश्याम अथोटे, भावेश राठौर, प्रितेश साठे, विजय राठौर यांचयासह असंख्य शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन

## ग्रंथपाल, विविध ग्रंथालयांचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.26 )-** स्थानिक जिजामाता सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय संघ यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन शहरातील महेश कॉलनी स्थित जिजामाता सार्वजनिक वाचनालयाच्या प्रांगणात आयोजीत करण्यात आले.

या अधिवेशना'या उद्घाटनीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष चंद्रकांत चांगदे होते तर उद्घाटक म्हणुन उत्क्रांती शिक्षण संस्थेचे माजी प्राचार्य रामराव वानखडे उपस्थित होते. या कार्यक्रमाला सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.सुरज मडावी, ग्रंथालय निरिक्षक गजानन कुरवाळे, जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह श्रीराम देशपांडे, जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य प्रदीप बहुरुपी, पंचशिल सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष गोपाल मालपे, जिजामाता सार्वजनिक वाचनालय वरुडचे सचिव अशोकराव निकम उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भावना खुजे, प्रास्तविक जिजामाता सार्वजनिक वाचनालयाचे चंद्रकांत भड तर आभार जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य प्रदीप बहुरुपी यांनी मानले.

यावेळी जिल्हाभरातून आलेल्या सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचा गौरव पुष्पगु' छ व मॉ जिजाऊ यांची प्रतिमा देवुन मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. व्दितीय सत्राचे संचालन पल्लवी केने तर आभार दिपाली पाटणे हिने मानले. तृतीय सत्रामध्ये ग्रंथालय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन व खुले अधिवेशन घेण्यात आले. यावेळी मार्गदर्शक म्हणुन सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ.राजेश पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.सुरज मडावी, ग्रंथालय निरिक्षक गजानन कुरवाळे, जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाह श्रीराम देशपांडे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष चंद्रकांत चांगदे उपस्थित होते. या कार्यक्रमाला जिल्हाभरातील सार्वजनिक ग्रंथालयांचे ग्रंथपाल, विविध ग्रंथालयांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### धामणगाव आयटीआयमध्ये रोजगार भरती मेळावा आज

**धामणगाव रेल्वे -** संत बगाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे (आयटीआय) येथे रोजगार भरती मेळाव्याचे आयोजन आज गुरूवार (ता. 27) सकाळी 10.30 वाजता करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते होणार आहे. तर विशेष अतिथी म्हणून संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा उद्योजक हेमंतकुमार जाधव, संस्था व्यवस्थापन समिती सदस्य अजय ठाकूर, हिंगणगाव कासारखेडा ग्रा.पं. सरपंच दुर्गाबक्षसिंग ठाकूर यांची उपस्थिती राहणार आहे. सदर मेळाव्यात विविध खाजगी कंपनींचे प्रतिनिधी येणार असुन ते मुलाखत घेऊन उमेदवारांची निवड करणार आहे.

# धामोडी गावच्या मुख्य मार्गाची दुरावस्था

## निधीसाठी ग्राम पंचायतचा पाठपुरावा

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.26 )-** तालुक्यातील धामोडी या गावाच्या मुख्य मार्गाची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली आहे. गेल्या 4 वर्षापासून ग्रामस्थ या मार्गाची मागणी करत आहेत. या मार्गाच्या दुरुस्तीकरिता निधी मिळावा यासाठी ग्राम पंचायतचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याकडे लोकप्रतिनिधीं व प्रशासकीय अधिकारी वर्गाचेही दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. तालुक्यापासून गावाला जोडणाऱ्या मार्गाची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाल्याने गावातील विद्यार्थी, प्रवाश्यांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. तरी प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अन्यथा गावकरी तीव्र आंदोलन करतील असा इशारा सरपंच पूनम अमोल गावंडे यांनी दिला आहे.



### पालकमंत्री बावनकुळे यांचा शुक्रवारी जनता दरबार

**अमरावती -** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जनता दरबार शुक्रवार, दि. 28 मार्च रोजी दुपारी 12 वाजता आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पालकमंत्री श्री. बावनकुळे नागरिकांना भेटीसाठी उपलब्ध असतील. नागरिकांनी त्यांच्या तक्रारी, निवेदने सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 29 ला चुरणी येथे सेवानिवृत्ती सोहळा व माजी विद्यार्थी मेळावा

## अजाबराव काळे पाटील विद्यालयात आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.26 ) -** स्वातंर्त्यवीर अजाबराव काळे पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, चुरणी येथे 29 मार्च रोजी संस्थेचे प्राचार्य अरविंद घोम व सहायक शिक्षक रविकुमार देशमुख यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात शाळेतील माजी माजी विद्यार्थ्यांचा मेळावाही पार पडणार आहे. शिक्षक व माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहबंधांचे अनमोल क्षण अनुभवण्याची संधी यावेळी लाभणार आहे.

स्वातंर्त्य संग्राम सैनिक शिक्षण संस्था, कुष्टाचे अध्यक्ष राजेंद्र अजाबरावजी काळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. अतिथी म्हणून मेळघाटचे आमदार केवलराम काळे, संस्थेचे सचिव सुरेंद्र अजाबराव काळे, उपाध्यक्ष आनंदकुमार काळे, गट शिक्षणाधिकारी, रामेश्वर माळवे, केंद्र प्रमुख सुरेंद्र अर्डक, सरपंच नारायण चिमोटे, उपसरपंच आशिष टाले, सामाजिक कार्यकर्ते बलराम वर्मा, तसेच माजी विद्यार्थी प्रतिनिधी डॉ. हेमंत चिमोटे व राहुल येवले उपस्थित राहणार आहेत. प्राचार्य अरविंद घोम व शिक्षक रविकुमार देशमुख यांनी आपल्या प्रदीर्घ सेवेत विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी आणि माजी विद्यार्थ्यांना आपल्या आठवणींना उजाळा देता यावा, याकरिता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शनिवार 29 मार्च रोजी सकाळी 10 वाजता शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालकवर्ग व ग्रामस्थ यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अमरावतीत राज्य शिक्षक संघाचे धरणे आंदोलन

## शिक्षण उपसंचालकांना दिले निवेदन | शिक्षकांचा लक्षणीय सहभाग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 ) -** राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात यावी याकरिता राज्य शिक्षक संघाच्यावतीने अमरावती येथे शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर एक दिवसांचे धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अमरावती सोबतच अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ येथेही शिक्षक संघाने धरणे आंदोलन केले. परिक्षण, समीक्षण व प्रशिक्षणाची कामे असतानासुद्धा आंदोलनात शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

राज्य शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष दिलीप कडू यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी शिक्षक संघाच्या पदाधिकार्यां नी मनोगत व्यक्त करताना शिक्षकांप्रती सरकारने अवलंबिलेल्या धोरणाचा निषेध नोंदविला. अनेक बाबतीत सरकारकडून शिक्षकांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत सरकार



उदासिन असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी शिक्षक संघाच्या एका शिष्टमंडळाने शिक्षण उपसंचालकांची भेट घेउन त्यांना एक निवेदन सादर केले.

या आंदोलनात विजुक्टाचे अरविंद मंगळे, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रवीण दिवे, शारीरिक शिक्षक संघटनेचे नितीन चवाळ, शिवदत्त ढवळे, विज्ञान अध्यापक मंडळाचे श्रीकांत कडू, विशाल भोयर, राज्य शिक्षक संघाचे पदाधिकारी ललित चौधरी, गजानन मानकर, रवींद्र हगवणे, राजेश हुतके, प्रदीप नोनोटे, नंदकिशोर नवरे, कैलास कडू, दादाराव टवलारे, वजाहत अली गाजी, जावेद अंजुम, विजय ठाकरे, विजय अतकरे, विनोद पाचडे, संदीप अंबाडकर, गणेश वायभासे, अतुल पडोळे, रवींद्र भटकर, राजीक पठाण, भारत शहारे, संजय अनासाने, ज्ञानेश्वर टाले, धनराज पुनसे, अनिल गायकी, विजय ठाकरे, प्रा. दीपक कुलट, अनंता मोहोड, प्रकाश गायन, संजय गेडाम, गोपाल वडतकर, प्रमोद घरडे, वजाहत अली गाजी, प्रकाश घाटे, प्रसाद देशमुख, डॉ. इशरत जबीन मॅडम, द्रौपदी ढगे, प्रिया कडू, उमेश राऊत, जिवन पावळे, कांचन लाजूरकर, स्वाती झाडे, रोशन मानकर, संजय माहुरे, उमेश रहाटे, नंदकिशोर खडसे, राजेश खराळेकर, स्वाती झाडे आदी प्रामुख्याने सहभागी झाले होते.

# विनाअनुदानित शिक्षकांचे जिल्हा कचेरीवर धरणे आंदोलन

## शाळांना, वर्ग तुकड्यांना वाढीव टप्पा देण्याची मागणी | घोषणाबाजीने दणाणला जिल्हाधिकारी कार्यालय परिसर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 ) -** राज्यातील सर्व अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, व उच्च माध्यमिक शाळांना तसेच वर्ग तुकड्यांना वाढीव टप्पा देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. या मागणीला घेऊन बुधवारी (दि.26) महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित शाळा कृती समितीच्यावतीने जिल्हाकचेरी मुख्य



प्रवेशद्वारासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

शासनाने राज्यातील 20, 40, 60 टक्के अंशता अनुदानित शाळा व वर्ग तुकड्यांना शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा देण्याचा निर्णय घेतला. यासाठी 10 ऑक्टोबर 2024 रोजी मंत्रिमंडळ बैठकीत तरतुदीचा निर्णय झालेला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांनाही शासनाने अनुदान देण्याबाबत निर्णय केलेला असून त्यांचेही आदेश शासन स्तरावर काढण्यात यावेत. तसेच अघोषित असणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांची यादी शासन स्तरावरून वाढीव अनुदानासह घोषित करावी. शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात यास मंजुरी देऊन सर्व शाळा व वर्ग तुकड्यांना पुढील वाढीव टप्पा अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच 14 ऑक्टोबर 2024 च्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकार्यांना देण्यात यावे,अशी मागणी यावेळी आंदोलनातून शिक्षकांनी रेटून धरली.

यावेळी आर जी पठाण, एस एस शिरसाठ, एस ए डहाके, विजय कळसकर ,राजा खंडारे, वसंत वाघ, अनिल तायडे, जीवन सोनसासकर, अजय वाणे यांच्यासह अनेक शिक्षक उपस्थित होते.


# शहर पोलिसांकडून आ.विजय वडेट्टीवारांची दिशाभूल?

## राज बागरींना ताब्यात घेतल्याची दिली माहीती, सुटकेचे ठेवले गुपित | आज पुन्हा बागरी हाजीर हो!



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )** - काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी अमरावतीचे तत्कालीन डेप्युटी आरटीओ राज बागरी (वर्धेकर) यांनी केलेल्या शासनाच्या फसवणूकीबाबत अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थित केला. मात्र अमरावती शहर पोलीसांनी चक्क मंत्री प्रताप सरनाईक यांना अर्धवट माहीती देत आ.वडेट्टीवार व मंत्री सरनाईक यांची दिशाभूल केल्याचे दिसत आहे. राज बागरी यांना ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली, मात्र सुटकेची माहिती पोलिसांनी गुपितच ठेवली. त्यामूळे बागरी प्रकरणात समावेश असलेल्या सर्वच पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी वरिष्ठ स्तराहून होणे गरजेचे झाले आहे.

राज बागरी यांना बुधवार (दि.26) ला पुन्हा एकदा गाडगे नगर पोलीस स्टेशनमध्ये हजर राहण्याकरिता नोटीस बजाविण्यात आली होती. ठरल्याप्रमाणे बागरी बुधवारी गाडगे नगर पोलीस स्टेशनमध्ये हजरही परंतू तपास अधिकारी समाधान वाठोरे हे बाहेर असल्यामूळे बागरींना गुरुवारी(दि.27)ला उपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. पोलीस व बागरींमधील हा 'तारिख पे तारिख' चा खेळ किती दिवस चालणार ? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.



अमरावती जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात
दलालांमार्फत नियमबाह्य कामे केल्याबाबत

(२९) * ८६१२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती उपप्रादेशिक परिवहन विभागातील श्री.राजकुमार वर्धेकर (बागडी), उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व दलाल यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नियमबाह्य कामांबाबत गाडगेनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हेगारी स्वरुपाचा कट व फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाचा तपास संथगतीने सुरु असून अद्यापही दोषींना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असे असतानाही श्री.वर्धेकर यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर १७ महिन्यांच्या कालखंडात दलालांच्या संगनमताने नियमबाहय कामे करुन शासनाची पुन्हा फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
श्री. प्रताप सरनाईक : (१), (२), (३), (४) व (५) श्री.राजकुमार वर्धेकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या जन्मतारखेबाबत सेवापुस्तकात खाडाखोड तसेच बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची आर्थिक फसवणूक व दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्याने शासन निर्णय दिनांक १६.०८.२०२४ अन्वये त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत. तसेच यासंदर्भात त्यांचेविरुध्द दिनांक २३.०८.२०२४ रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ अन्वये गुन्हा क्रमांक ६९५/२०२४ नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीसांनी त्यांना दिनांक १८.०३.२०२५ रोजी ताब्यात घेतले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यात वीज शुल्कापोटी केली जाणारी जादाची वसूली रोखण्याबाबत

### 'जी फार्म' है तो मुमकीन है!

अनधिकृत आर्थिक देवाण घेवाणीकरिता 'जी फार्म' हा कोड वर्ड संपुर्ण प्रादेशिक परिवहन खात्यात नावाजलेला आहे. आता याच 'जी फार्म' ची व्याख्या बागरींनी पोलीसांनाही शिकविली असावी असे बागरींना मिळत असलेल्या पोलीसांच्या सॉफ्ट कॉर्नरमधून दिसत आहे.

### काय होता आ.वडेट्टीवारांचा तारांकीत प्रश्न

**विजय वडेट्टीवार ( ब्रम्हपूरी )-** अमरावती जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात दलालांमार्फत नियमबाह्य कामे केल्याबाबत सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (1) अमरावती उपप्रादेशिक परिवहन विभागातील श्री. राजकुमार वर्धेकर (बागडी), उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व दलाल यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय, (2) असल्यास, या नियमबाहा कामांबाबत गाडगेनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हेगारी स्वरुपाचा कट व फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय, (3) असल्यास, या प्रकरणाचा तपास संथगतीने सुरु असून अद्यापही दोषर्षीना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय, (4) असे असतानाही वर्धेकर यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर 17 महिन्यांच्या कालखंडात दलालाच्या संगनमताने नियमवाहय कामे करून शासनाची पुन्हा फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय, (5) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे. (6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रताप सरनाईक** - (1), (2), (3), (4) व (5) श्री. राजकुमार वर्धेकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांच्या जन्मतारखेबाबत सेवापुस्तकात खाडाखोड तसेच बनावट कागदपत्रे सादर करुन शासनाची आर्थिक फसवणूक व दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्याने शासन निर्णय दिनांक 16.08.2024 अन्वये त्यांच्या सेवा समाम करण्यात आल्या आहेत. तसेच यासंदर्भात त्यांचेविरुध्द दिनांक 23.08.2024 रोजी पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे भारतीय दंड विधान कलम 420, 467, 468, 471, 120 (ब), 34 अन्वये गुन्हा क्रमांक 695/2024 नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीसांनी त्यांना दिनांक 18.03.2025 रोजी ताब्यात घेतले आहे.



# बडनेरात नियमित पाणी पुरवठा व्हावा!

## शिवराय कुळकर्णी यांची म.जी.प्रा. अधिकाऱ्यांशी चर्चा



**महासागर प्रतिनिधी**
**बडनेरा,( दि.26 )** - बडनेरा विधानसभा मतदारसंघातील बडनेरा व आसपासच्या परिसरात आठ आठ दिवस नळ येत नसल्याने पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून बडनेरा व अमरावती शहरातील बडनेरा लगतच्या भागात नियमितपणे पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी आज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे केली.

शिवराय कुळकर्णी यांच्या नेतृत्वात बडनेरा व परिसरातील नागरिकांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांशी आज सविस्तर चर्चा केली. जीवन प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता सोलंकी, उपअभियंता लेवरकर, आजने आणि अन्य अधिकाऱ्यांशी चर्चा करून परिसरातील सर्व समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. जुन्या वस्तीतील काही भागात आणि नव्या वस्तीतील बहुतांश भागांमध्ये पाणी पुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. बडनेरा शहरात आठ-आठ दिवस नळ येत नाहीत. पाणी टंचाईमूळे लोक त्रस्त झाले आहेत. किमान एक दिवसाआड का असेना पण नियोजित वेळेवर आणि नियमितपणे पाणीपुरवठा व्हावा अशी मागणी शिवराय कुळकर्णी यांनी जीवन प्राधिकरणच्या अधिकऱ्यांकडे केली. कुळकर्णी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संपर्क साधून परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या बिकट प्रश्ना विषयी त्यांनाही अवगत केले.

त्यांनीही अधिकाऱ्यांना याप्रकरणी तत्काळ तोडगा काढावा अशा स्पष्ट सूचना फोनवरून दिलेल्या आहेत. या शिष्टमंडळात राजेश मन्नालाल शर्मा, तुषार रमेश अंभोरे, स्वप्निल धोटे, अनिल भारती, निलेश पवार, गौरव बांते, प्रमोद पोकळे, अश्विन नागरेचा, रवी बनसोड, देवडा यांचा प्रामुख्याने समावेश होता.

# काठीने मारहाण करुन इसमाची हत्या

## शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )** - मंदिराची घंटा चोरल्याच्या कारणावरून एका 50 वर्षीय व्यक्तीला काठीने मारहाण करण्यात आली. त्यात त्याचा मृत्यू झाल्याची घटना शिरजगाव कसबा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बहिरम ते बैतूल रस्त्यावर घडली.

शेख अफसर शेख समद (50, कारंजा बहिरम, चांदूर बाजार) असे मृताचे नाव आहे. पुतण्या शेख इर्शाद शेख रौफच्या फिर्यादीवरून शिरजगाव पोलिसांनी दिनेश निरंजर दंडे (24, इंदिरा नगर, करजगाव, चांदूर बाजार) याच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपी दिनेश दंडे याला अटक केली आहे. तक्रारदार शेख इर्शाद हे ऑटोचालक आहेत. 24 मार्च रोजी रात्री 10.15 वाजता शेख इर्शाद यांना अजय मोहोड याचा फोन आला व आरोपी दिनेश तुझे काका शेख अफसर यांच्यात मारपीट होत असल्याचे सांगितले. माहिती मिळताच शेख इर्शाद यांनी तातडीने घटनास्थळ गाठले. तेथे आरोपी दिनेशला भांडणाचे कारण विचारले असता, शेख अफसर याने मंदिरातील घंटा चोरल्याच्या कारणावरून मारहाण केल्याचे सांगितले. शेख इर्शाद यांनी शेख अफसरला जखमी अवस्थेत अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात आणले. जखमी शेख अफसर याने सांगितले की, आरोपी दिनेश दंडे हा गेल्या चार ते पाच दिवसांपासून दारू पिण्यासाठी पैसे मागत होता. मात्र पैसे न दिल्याने शेख अफसर यास शिवीगाळ करीत झेंड्याच्या काठीने मारहाण केली. शेख इर्शाद यांनी जखमी काका शेख अफसर यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याबाबत शेख इर्शाद यांनी शिरजगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी दिनेश दंडे याच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# राजर्षी शाहू कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेची जय्यत तयारी

## देश विदेशातील संशोधकाची हजेरी




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.26 )**- चांदूर रेल्वे शहरातील राजर्षी शाहू सायन्स कॉलेज येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन आज 27 मार्चला सकाळी 10.30 वाजता करण्यात आले असुन याकरिता जय्यत तयारी करण्यात आली आहे.

राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे, विनायक विज्ञान महाविद्यालय, नांदगाव खंडेश्वर तथा आय.क्यू.ए.सी. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने इनोवेटीव्ह मल्टीडिसीप्लिनरी परस्पेक्टीव्ह ट्रान्सफॉर्मेशम इन सायन्स अँड टेक्नॉलॉजी - 2025 या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिषदेच्या अध्यक्षस्थानी अतुल विद्या मंदिर संस्थेच्या अध्यक्षा प्रा. उत्तरा जगताप व आमदार सुलभा खोडके या राहणार आहे. तर परिषदेचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते व माजी कुलगुरू डॉ. राजू मानकर यांच्या हस्ते होणार आहे. यप्रसंगी माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, यश संजय खोडके, शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, डॉ. हेमंत देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या परिषदेत विविध संशोधक वक्ते आपले मार्गदर्शनपर विचार व्यक्त करणार आहे.

याशिवाय डॉ. एस.बी. सोमवंशी (भौतिकशास्त्र विभाग लिमरिक कास्ट्रेटोली, आयर्लंड), डॉ. आशिष गाडेकर (अधिष्ठाता व्यवस्थापन शाखा, मॉरिशियस), अन्वया वडनेरकर (रिसर्च असोसिएट, युएस) हे वक्ते ऑनलाईन प्रणालीव्दारे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेत 500 हून अधिक विविध प्राध्यापक, शिक्षक, संशोधक विद्यार्थी, औद्योगिक क्षेत्रातील संशोधक आपला शोध निबंध सादर करणार आहेत. सदर आंतराष्ट्रीय परिषदेला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. पराग वडनेरकर, प्राचार्य डॉ. अलका भिसे तसेच परिषदेचे समन्वयक व आयोजक डॉ. एम.पी. चिखले, डॉ. एस.पी. खोडके, डॉ. एस.ए. वाणी, डॉ. अनंत वडतकर यांनी केले आहे.

# वरुडमधील राष्ट्रसंत कॉलनीत घरफोडी

**वरुड-** शहरातील राष्ट्रसंत कॉलनीत अज्ञाताने दरवाजाचा कुलूप कोंडा तोडून आठ हजार रुपयांचा म माल चोरून नेल्याची घटना सोमवार दिनांक 24 ला उघडकीस आली फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास वरुड पोलीस करीत आहे. पोलीस सूत्रानुसार, विश्वनाथ दमडूजी रामटेके (वय 66 वर्ष धंदा शेती रा. राष्ट्रसंत कॉलनी,वरुड) असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेच्या दिवशी विश्वनाथ हे मुलाला भेटण्याकरीता नागपूर येथे गेले होते. त्यामुळे घरी कोणीच नव्हते याच संधीचा फायदा घेऊन अज्ञातांनी आरोपीचे घराचे कुलूप कोंडा तोडून एक चांदीचा करंडा वजन 8 ग्रॅम किंमत 1000 रुपये व चांदीचा शिक्का 10 ग्रॅम 1000 रुपये चांदीचे दोन जोडवे वजन 10 ग्रॅम 1000 रुपये व नगदी 5000 रुपये असे एकूण 8 हजार रुपयांचा माल अज्ञात चोराने चोरून नेला.

# अल्युमिनिअमचे पाईप चोरी करणारा अटकेत

## 80 हजाराचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.26 )** - खापर्डे बगिचा स्थित करवा आर्केट येथील आर्या सेल्स कार्पोरेशन या व्यापारी प्रतिष्ठानातील चोरी प्रकरणात सिटी कोतवाली पोलिसांनी एका आरोपीला 26 मार्च रोजी एका आरोपीला तिवस्यातून अटक केली. शिवदास राममसिंग भोसले (20, रा.साससी, तिवसा, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिस सुत्रानुसार, 23 मार्च रोजी शैलेंद्र झिपराजी बोंडे (49, रा. गव्हरमेंट इंजीनिअरींग कॉलेज समोर, अमरावती) यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली की, ते आर्या सेल्स कापोरेशन नामक दुकानात काम करतात. 22 मार्च रोजी सकाळी 10 वाजताच्या सुमारास ते आर्या सेल्स कार्पोरेशन दुकानात कामावर आले असता, त्यांना पायर्यावर ठेवलेले अल्युमिनियम पाईपचे बंडल दिसले नाही. त्यामुळे ते पाईल अज्ञात चोराने 1 लाख 33 हजार रुपये किमंतीचे पाईप चोरून नेल्याचे दिसून आले. या घटनेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदवून तपास सुरु केला. दरम्यान 24 मार्च रोजी गुप्त माहितीवरून पोलिसांनी आरोपी शिवदास राममसिंग भोसलेला गुन्ह्यात अटक करून चौकशी केली असता, त्याने चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. त्यामुळे पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून अल्युमिनियम पाईप व गुन्ह्यात वापरलेला तीनचाकी कटला असा एकुण 80 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला. सदरची कारवाई वा पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त देवदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक मनोहर कोटनाके, विजया पंधरे, पोलिस उपनिरीक्षक विजय गिते, रंगराव जाधव, शंकर भगत, पोलिस हवालदार मलिक अहेमद, प्रमोद हरणे, पंकज अंभोरे, आकाश इंगोले, मोनल तिडके, विजय यादव यांनी केली.

# शालेय पोषण आहारात संत्र्यांचा समावेश करा!

## संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.26 )** - तालुक्यात संत्र्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेतल्या जाते, परंतु कधीकधी उत्पादन खर्च निघेल इतकाही भाव संत्रा उत्पादकाला मिळत नाही. त्यामुळे संत्र्याला राजाश्रय मिळावा म्हणून शालेय पोषण आहारात संत्र्याचा समावेश करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकर्यांनी केली आहे. ऑक्टोंबर डिसेंबरमध्ये येणारा आंबिया बहार व फेब्रुवारी मार्च मध्ये येणारा मृगबहार यांना योग्य भाव न मिळाल्यामुळे संत्रा उत्पादकांचे नुकसान होते. ते नुकसान टाळण्यासाठी कमीत कमी त्या कालावधीत जरी शासनाने शालेय पोषण आहारात संत्रा या फळांचा समावेश केला तर शेतकर्यांधना दिलासा मिळेल, असे या शेतकर्यांचे म्हणणे आहे. शासनाने जर संत्रा मालाची खरेदी केली तर त्याचा जास्तीत जास्त व प्रत्यक्ष लाभ शेतकर्यांना मिळेल. विना रासायनिक प्रक्रियेने पिकवण्यात येणारे हे फळ असल्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांच्या शरीरावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही. आरोग्यवर्धक असणारे हे फळ शालेय पोषण आहारात समाविष्ट केले तर विदर्भातील तसेच अन्य भागातील संत्रा उत्पादक शेतकर्यांनि योग्य बाजारपेठ व समतोल भाव मिळेल हा यामागे मुख्य उद्देश आहे. त्यामुळे या भागातील आमदार उमेश यावलकर यांनी ही बाब शासनाच्या लक्षात आणून देऊन संत्रा फळाचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

### चविष्ट तेवढेच आरोग्यदायी



संत्रा फळ जेवढे चविष्ट आहे तेवढेच आरोग्यासाठी फायदेशीर देखील आहे. यामुळे जीवनसत्व क ची कमतरता भरली जाते. स्फूर्ती व सौंदर्य यांच्या दृष्टीने या संत्रा फळाचे महत्त्व आहे. त्यामुळे शासनाने शालेय पोषण आहारात संत्र्याचा समावेश करावा, असे बारगाव येथील शेतकरी श्रीधर उर्फ बाळासाहेब सोलव यांनी म्हटले आहे.

### शासनाने संत्र्याला राजाश्रय मिळवून द्यावा



वरुड मोर्शी तालुका हा संत्र्याच्या बाबतीत विदर्भाचा कॅलिफोर्निया म्हणून ओळखल्या जातो. परंतु आज मात्र संत्रा उत्पादकांची अवस्था आधुनिक बाजारपेठेशिवाय दयनीय झाली आहे. लाखो, करोडो रुपयांचा संत्रा आधुनिक बाजारपेठे अभावी कवडीमोल भावात विकावा लागतो. त्यामुळे या संत्र्याचे शालेय पोषण आहारात समावेश झाला तर संत्रा उत्पादक शेतकर्या ना राजाश्रय मिळून योग्य भाव मिळू शकतो, असे माजी पंचायत समिती सभापती विक्रम ठाकरे यांनी म्हटले आहे.

# आ. चंदु यावलकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वेधले सभागृहाचे लक्ष्य

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले महत्वपुर्ण मुद्दे



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.26 )** - मोर्शीचे आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मोर्शी-वरुड भागातील विविध मुद्यांवर प्रकाश टाकून सभागृहाचे लक्ष वेधले. प्रामुख्याने या परिसरातील शेतकर्या च्या मुद्यांवर भर देवून त्यांनी विधानसभा सभागृहात निवेदन सादर केले.

वरुड तालुक्यातील शेतकर्यांच्या पिकांचे वन्य प्राण्यांमुळे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रभावी संरक्षण योजना राबवून नुकसानग्रस्त शेतकर्यांना भरपाई द्यावी. शेतकर्यांच्या कापसाच्या दरात वाढ झाली असली तरी तो उत्पादन खर्चाच्या तुलनेत अपुरा आहे. त्यामुळे शेतकर्यांना योग्य भाव मिळावा, यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात. निराधार, वृद्ध आणि अपंग नागरिकांना मिळणारी आर्थिक मदत वेळेवर न मिळाल्याने त्यांना अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे 1500 ते 2000 पर्यंतची मदत दर महिन्याला वेळेवर मिळावी, यावर यावलकर यांनी सभागृहात जोर दिला.

### पांदण रस्त्याच्या प्रश्नावर चर्चा

मोर्शी आणि वरुड तालुक्यातील पांदण रस्त्यांचा मुद्दा त्यांनी उचलला. पांदण रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. त्यामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासातून त्यांची मुक्तता करण्यासाठी ही कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. मोर्शी आणि वरुड तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांची वीजबिल थकबाकीमुळे वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात आहे, त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. या योजना सौरऊर्जेवर चालवील्यास ही समस्या कायमची सुटेल, यासाठी तातडीने पावले उचलावीत याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलावीत, अशा मागण्या करण्यात त्यांनी केल्या.